भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सह्योगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २३.०५.२०२० ते २७.०५.२०२०)

| अंक ४०@२०२० | दिनांक २२.०५.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१५/०५/२०२० ते २१/०५/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता २३/०५/२०२० ते २७/०५/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५/०५ | १६/०५ | १७/०५ | १८/०५ | १९/०५ | २०/०५ | २१/०५ | दिनांक | २३/०५ | २४/०५ | २५/०५ | २६/०५ | २७/०५ |
| ३.२ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | २ | ५ | ६ | ५ | ० |
| ३९.० | ३५.५ | ३६.० | ३६.५ | ३८.० | ३८.० | ३६.० | कमाल तापमान (अं. से) | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३७ |
| २४.० | २४.० | २५.० | २६.० | २६.० | २६.० | २५.० | किमान तापमान (अं. से) | २५ | २५ | २५ | २६ | २६ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | मेघाच्छादन (ऑक्टा.) सकाळ | १ | २ | १ | १ | २ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) दुपार | | | | | |
| ९० | ८४ | ८४ | ७७ | ८२ | ८५ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९२ | ९२ | ९१ | ९२ | ७१ |
| ४९ | ५२ | ४७ | ५३ | ४८ | ५२ | ५७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५१ | ४८ | ४५ | ४९ | ५१ |
| २.२ | १.२ | १.८ | २.५ | १.७ | १.३ | २.३ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००६ | ००६ | ००६ | ००७ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | वा-याची दिशा सकाळ | नैॠत्य कडे | वायव्य कडे | पश्चिमोत्तर / नैॠत्य कडे | वायव्य कडे | वायव्य कडे |
| स्थिर | पश्चिमोत्तर /वायव्य | पश्चिमोत्तर /वायव्य | पश्चिमोत्तर /नैॠत्य | पश्चिमोत्तर /नैॠत्य | पश्चिमोत्तर /वायव्य | पश्चिमोत्तर /नैॠत्य | वा-याची दिशा दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ३.२ | ०.० | ३.२ |

| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती: | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमानामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर दिनांक २३, २४, २५ व २६ मे, २०२० रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व मुख्यत्वे निरभ्र राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे |
|---|---|

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, भुईमुग, नागली | पूर्वमशागत | भात कापणी केलेल्या भेटतील धसकटे नष्ट करावीत. जय शेतातील काढणी पूर्ण झालेली असेल त्या शेताची नांगरट करून जमीन उन्हात चांगली तापू द्यावी. खरीप हंगामासाठी भात, भुईमुग, नागली इ. पिकांची निवड करून सुधारीत जातीचे बियाणे ऊपलब्ध करून ठेवावे. खरीप हंगामातील पिकांच्या दृष्टीने पुर्व तयारीस लागावे. भात पिकाच्या रोपवाटीकेकरिता शेताची मशागत करावी. |
| आंबा | काढणी व नवीन लागवड | येत्या आठवड्यामध्ये वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना काठीचा आधार द्यावा. त्याचबरोबर उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>जिल्ह्यामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंड्याच्या आकाराची फळे व मोठया आकाराची काढणीची फळे अशी अवस्था आहे. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दूपारी चारच्या नंतर नूतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के (चौदा आणे) पक्वतेला काढावीत.<br>काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारसीनूसार बूरशीनाशकाची व ईथीलीनची प्रक्रिया देवुन पिकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. |
| काजु | नवीन लागवड | येत्या आठवड्यामध्ये वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या काजु कलमांना काठीचा आधार द्यावा. त्याचबरोबर उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पड्लेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| नारळ | फळविकास | येत्या आठवड्यामध्ये वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार द्यावा. त्याचबरोबर उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| आंबा, काजू, नारळ, व सुपारी | नवीन लागवड | आंबा, काजू, नारळ, सुपारी इ. फळझाडांची नवीन लागवड करावयाच्या जागेत जंगली झाडे-झुडपे काढून साफसफाई करून घ्यावी. आंब्याच्या लागवडीसाठी 10 × 10 मी. अंतरावर 1 × 1 × 1 मी. आकाराचे, काजूसाठी 7 × 7 मी. अंतरावर 0.6 × 0.6 × 0.6 मी. आकाराचे, नारळासाठी 7.5 × 7.5 मी. अंतरावर 1 × 1 × 1 मी आकाराचे आणि सुपारीसाठी 2.7 × 2.7 मी. अंतरावर 0.6 × 0.6 × 0.6 मी. आकाराच खडडे खोदून उन्हात चांगले तापत ठेवावेत. तयार केलेले खडडे 3 ते 4 घमेली शेणखत किंवा कंपोस्ट आणि 1 कि. सिंगल सुपर फाॅस्फेट या मिश्रणाने भरुन घ्यावेत. |
| फळप्रक्रिया | | आंबा, कोकम, फणस, करवंद, जांभूळ इ. फळांच्या उपलब्धतेनुसार प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करावेत |
| माती परिक्षण | | पिकांच्या काढणीनंतर पिकांची धसकटे, पालापाचोळा, गवत ईत्यादी शेतामध्ये जाळु नयेत, जाळले असता जमिनीतील पिकांच्या पोषण द्रव्यांचा –हास होतो व जमिनीची सुपीकता कमी होते. जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परीक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितीसाठी मृद शास्त्रK, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला यांचेकडे संपर्क साधावा. (दुरध्वनी क्र. ०२३६६-२६२२३४) |
| दुभती जनावरे, | | जनावरांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी गोठ्यामध्ये हवा खेळती राहिल याची दक्षता घ्यावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डा. प्रदिप च. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ | डा. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ |
|---|---|---|